आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ३ ऑगस्ट २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ४१ । पाने : ४ । मूल्य २ ₹

## आज बारावीचा निकाल



मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा बारावीचा निकाल अखेर आज दुपारी ४ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे.

https://hscresult. 11thadmission. org.in, https://msbshse.co.in, hscresult.mkcl.org, mahresult.nic.in याशिवाय www.mahresult.nic.in d https:// msbshse.co.in या संकेतस्थळांवर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# फोडलेला सांडवा पुन्हा बांधून द्या

## आरणवाडी साठवण तलाव प्रश्नी शेतकरी आक्रमक; तब्बल २ तास रस्ता रोको

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील आरणवाडी साठवण तलाव पहिल्यांदाच भरला आहे. दरम्यान त्याचा परिसराला धोका असल्याचे सांगत पाटबंधारे विभागाने सांडवा फोडल्यामुळे पाच गावातील ग्रामस्थ आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले. फोडलेला सांडवा पुन्हा बांधून देण्याच्या मागणीसाठी शेकडो रस्त्यावर उतरले आहेत. ग्रामस्थांनी सोमवारी तब्बल दोन तास रस्ता रोको आंदोलन केले.

या आंदोलनाप्रसंगी रस्त्यावर वाहतुकीची मोठी कोंडी झालेली पहायला मिळाली. संबंधित विभागाकडून सांडवा बांधून देण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी रास्तारोको मागे घेतला आहे. डोंगराळ भागात हरितक्रांती करणाऱ्या आरणवाडी साठवण तलावाचा सांडवा पाच गावांच्या ग्रामस्थांचा होणारा विरोध झुगारून प्रशासनाने सुरक्षिततेच्या कारणावरून फोडला आहे. धारूर तालुक्यात आरणवाडी साठवण तलावाचे काम १७ वर्षापासून संथ गतीने सुरू होते. यावर्षी हे काम कसेतरी पूर्ण झाले. या तलावाच्या बाजूने गेलेल्या पर्यायी राष्ट्रीय महामार्गाचे काम करताना रस्त्याची उंची वाढविली नाही. २० जुलैला एमआरडीसीने पत्र देऊन पाणीसाठा कमी ठेवावा अन्यथा रस्त्यास धोका होऊ शकतो, असे कळविल्यानंतर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली. तलावाच्या सुरक्षितेचे कारण पुढे करत पहिल्या वर्षी ८५ टक्केच पाणी ठेवता येईल, असे निरीक्षण नोंदवत सांडवा फोडावाच लागेल, अशी भूमिका घेतली. पाच गावांच्या ग्रामस्थांनी विरोध करत आक्रमक भूमिका घेतली.





**...तर जलसमाधी घेऊ : रमेश आडसकर**

निकृष्ट रस्ता कामासाठी तलावाचा सांडवा फोडणाऱ्या आणि निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून १५ ऑगस्ट पर्यत सांडवा दुरूस्त करा, अन्यथा शेतकऱ्यांसह जलसमाधी घेऊ असा इशारा भाजपा नेते रमेश आडसकर यांनी दिला. परिसरातील आरणवाडी साठवण तलावा जवळून गेलेल्या खामगाव-पंढरपूर महामार्गातील ५०० मीटर रस्त्याचे कामे बोगस झाल्याने गुत्तेदाराने स्वतःच्या राजकीय ताकदीचा वापर करत पाठबंधारे कार्यालयाशी संगणमत करून साठवण तलावाचा सांडवा फोडला. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी सोमवारी रास्ता रोको केला. यावेळी आडसकर यांनी जलसमाधीचा इशारा दिला.

आरणवाडी साठवण तलावाचा सांडवा फोडण्यास परिसरातील पाच ते सहा गावातील शेतकऱ्यांचा विरोध असताना पोलीस बळाचा वापर करून सांडवा फोडण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. सांडवा फोडणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, सांडवा पूर्ववत करावा, या मागणीसाठी शेतकऱ्यांनी एकत्र येत सोमवारी रस्ता रोको केला. दरम्यान, सांडवा फोडणारे अधिकारी आणि राज्यरस्ते विकास महामंडळाचे अधिकारी आंदोलनाकडे न फिरकल्याने शेतकरी संतप्त झाले होते.

अधिकारी येवून लेखी देत नाहीत तोपर्यंत आंदोलन मागे घेत नाहीत अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. यानंतर जलसंपदा विभागाचे शाखा अभियंता यांनी ऑक्टोबर महिन्यापर्यंत सांडवा बांधून देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. दोन तास आंदोलन सुरू होते जिल्हाधिकारी रवींद्र जगताप यांनी रमेश आडसकर यांना येत्या दोन दिवसात संबंधित दोन्ही विभागाची बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल असेही दूरध्वनीवर आश्वासन देण्यात आले. तीन महिन्यात साडवा बांधून देण्याचे लेखी आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात रमेश आडसकर, धारूर बाजार समितीचे सभापती सुनिल शिनगारे, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सादिक इनामदार, बालासाहेब चव्हाण, जिल्हा बँकेचे संचालक महादेव तोंडे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब कुरूंद, प्राचार्य विजय शिनगारे, भाजपा उपाध्यक्ष शिवाजी मायकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष बालासाहेब चोले, शहराध्यक्ष दत्ता धोत्रे, भाजयुमोचे शहराध्यक्ष मोहन भोसले, विनायक शिनगारे, काँग्रेसचे सिध्देश्वर रणदिवे, प्रभाकर चव्हाण, महादेव सातपुते, बंडोबा सांवत, पहाडीपारगावचे सरपंच वचिष्ठ मुंडे, चोरांबाचे सरपंच भालेराव, आरणवाडीचे सरपंच लहू फुटाणे आदींनी मार्गदर्शन केले. या आंदोलनास भाजप, शिवसेना, काँग्रेस, शेकापसह इतर राजकीय, सामाजिक पक्ष संघटनांनीही पाठिंबा दिला.

## दहावीतील गुणवंतांना दोन लाखाची स्कॉलरशिप; 'समाजकल्याण'चा निर्णय



प्रतिनिधी

बीड : इयत्ता दहावीमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना ९० टक्के मार्क्स मिळाल्यानंतर त्याला दोन वर्षे दोन लाख रूपये मिळणार आहेत. अशा प्रकारचा शासन निर्णय राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने घेतला असल्याने इयत्ता दहावी नंतर ज्यांना डॉक्टर, इंजिनिअर अथवा व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा आहे. त्यासाठी सोपे होणार आहे.

इयत्ता दहावीनंतर अभ्यासू विद्यार्थ्याला डॉक्टर इंजिनिअर होण्यासाठी हुशार असतांनाही केवळ नीट आणि सीईटीची भरमसाठ फिस असल्यामुळे विद्यार्थ्याला केवळ आर्थिक परिस्थितीमुळे कोचिंग क्लासला ॲडमिशन घेता येत नव्हते. त्यामुळे हुशार असूनही केवळ आर्थिक परिस्थिती खराब असल्याने डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे स्वप्न पाहता येत नव्हते. किंवा ते स्वप्न प्रत्यक्षात उतरवता येत नव्हते. ही बाब लक्षात घेवून सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी हा निर्णय घेतला.

## फास्टट्रॅकन्यूज

### दीर्घ रजेनंतर जिल्हाधिकारी रविंद्र जगताप रूजू



बीड : एक महिन्याच्या दीर्घ मुदतीच्या रजेवर गेलेले जिल्हाधिकारी रविंद्र जगताप हे परतले असून त्यांनी सोमवारी जिल्हाधिकारी पदाचा परत पदभार स्विकारला आहे. वैयक्तिक कारणामुळे गेल्या एक महिनाभरापूर्वी जिल्हाधिकारी रविंद्र जगताप हे रजेवर गेले होते. त्यांचा पदभार अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांच्याकडे होता. जगताप हे रजेवरून परतले असून ते आज रूजू झाले आहेत. त्यामुळे नियमित जिल्हाधिकारी आल्यामुळे प्रशासन गतीने कामाला लागेल. सोबतच कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची आरोग्य व्यवस्थाही व्यवस्थित काम करेल अशी आशा जनतेसोबत प्रशासनाला आहे.

### प्रहारचा माजलगावात हलगी बजाव मोर्चा

माजलगाव : तालुक्यातील अनेक गावातील ग्रामसेवकांनी दिव्यांगांचा ५ टक्के निधी वाटप केला नाही. त्यामुळे अशा बेजबाबदार ग्रामसेवकांचा पगार रोखून त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने माजलगाव पंचायत समिती कार्यालयावर सोमवारी हलगी, ढोल बजाओ मोर्चा काढण्यात आला.

दिव्यांगांचे हितरक्षणासाठी शासनाकडून २०१६ पासून माजलगाव पंचायत समिती कार्यालय येथे दिव्यांगांचा पाच टक्के निधी पडून आहे. येथील काही ग्रामसेवकांनी हलगर्जीपणा करून तो निधी संबंधित लाभार्थ्यांना वाटप करण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे अशा ग्रामसेवकांचे वेतन रोखून त्यांच्यावर त्वरित कायदेशीर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सोमवारी हे हलगी ढोल बजाओ मोर्चा काढण्यात आला.

### कंत्राटदारांचे बहिष्कारास्त्र

बीड : गत दोन वर्षापासून कोरोनाचे कारण देत राज्य शासनाकडून रस्ते कंत्राटदारांना केलेल्या कामांचीही देयके देण्यास टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह राज्यभरातील रस्ते कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. थकीत देयके प्रश्नी ठिकठिकाणी कंत्राटदारांच्या विविध संघटना एकवटल्या असून देयके न दिल्यास नवीन बांधकामांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला असून लवकरच निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यमार्गासह अंतर्गत रस्ते राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागासह जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून केली जातात, तर महामार्गाची कामे हे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून केली जातात. राज्यातील जवळपास ३ लाख कंत्राटदारांची वर्षभरापासून दोन हजार कोटींवर देयके सार्वजनिक बांधकाम विभागाकडे थकित आहेत. याबाबत राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेने अनेकदा स्मरणपत्रे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल, सार्वजनिक बांधकाम मंत्री, राज्यमंत्री, सचिव यांना दिली आहेत. याबाबत आजपर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. यामुळे या सर्व घटकांची व यावर अवलंबून असणाऱ्या दोन कोटी लोकांच्या कुटुंबांची उपासमार होत आहे. दरम्यान, सद्यस्थितीत केवळ केंद्र सरकारकडून काही प्रमाणात महामार्ग कामांची देयके मिळत असल्याने रस्ते कंत्राटदारांच्या संस्था चालू आहेत. परंतू, राज्य शासनाकडे कोट्यवधींची देयके थकल्याने रस्ते कंत्राटदार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.



## संपादकीय

# उत्तरप्रदेश 'लॉ कमिशन'च्या निमित्ताने

देशात उत्तरप्रदेश लॉ कमिशनच्या निमित्ताने एका वेगळ्या विषयाची चर्चा सुरू झाली आहे. उत्तरप्रदेशमध्ये घटनेनुसार स्वायत्त असलेली उत्तरप्रदेश लॉ कमिशन' नावाची संस्था आहे. या संस्थेने नुकतेच जनसंख्या नियंत्रण कायद्याविषयी सूतोवाच केले आहे. अर्थात या संदर्भातला त्यांचा मसुदा उत्तर प्रदेशच्या राज्य सरकारकडे जाणार आणि येऊ घातलेल्या उत्तर प्रदेश विधानसभा अधिवेशनात तो मंजूर होणार हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. त्याच वेळी जागतिक जनसंख्या दिनाच्या औचित्याच्या निमित्ताने उत्तर प्रदेश सरकारने लोकसंख्येसंदर्भात एका धोरणाचे सूतोवाच केले. या धोरणाच्या मसुद्यात बरीच आकडेवारी आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा पाचच्या आसपास असणारा प्रजनन दर ७० वर्षांनी २.२ वर स्थिरावला आहे. उत्तर प्रदेश हे भारतातले सर्वात मोठे राज्य. उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यांमध्ये देशाची २३ टक्के लोकसंख्या राहते. आतापर्यंत भारताचे आठ पंतप्रधान उत्तर प्रदेशमधूनच आले; परंतु त्याच उत्तर प्रदेशमधला प्रजनन दर हा राष्ट्रीय प्रजनन दरापेक्षाही खूप जास्त म्हणजे जवळपास २.७ एवढा आहे. अर्थातच, हा दर कमी करणे हे योगी सरकारने आपले कर्तव्य मानले आणि २०३० पर्यंत हा दर २.७ वरून १.९ पर्यंत आणण्याचे नियोजन केले. सध्या उत्तरप्रदेशची लोकसंख्या शेजारच्या पाकिस्तानएवढी आहे. उत्तर प्रदेश हे एक वेगळे राष्ट्र असते, तर लोकसंख्येनुसार त्याचा क्रमांक जगात आठवा आला असता. तसेच उत्तर प्रदेशमध्ये जे, जे घडते त्यावर संपूर्ण भारतीय प्रसारमाध्यमच नाही, तर जागतिक माध्यमांचेही लक्ष असणे स्वाभाविक आहे. उत्तरप्रदेशचे हे धोरण जाहीर होणे आणि नेमके त्याच वेळी उत्तर प्रदेश लॉ कशिमन या स्वायत्त संस्थेने जनसंख्या नियंत्रणाचा कायदा समोर आणणे ही बाब अनेकांना योगायोगाची वाटत नाही. या धोरणावर प्रतिक्रिया देण्यासाठी १९ जुलैपर्यंतची तारीख देण्यात आली होती. काय आहे या मसुद्यात? दोनपेक्षा अधिक मुलं झाली, तर सरकारी नोकऱ्या, बढत्या, सवलती यापासून वंचित राहावे लागेलच; परंतु ग्रामपंचायत, जिल्हा परिषद या निवडणुकांनाही उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही. अर्थात, होणाऱ्या मुलांची संख्या दोन किंवा त्याहून कमी ठेवली आणि तुम्ही सरकारी नोकरीत असाल, तर सवलतींचा वर्षाव देखील होणार आहे. वानगीदाखल या दोन सवलती पाहा. सेवाकाळात दोन जादा पगारवाढी, १२ महिन्यांची केवळ मातृत्वाची नव्हे, तर पितृत्वाची भरपगारी रजा. भारताच्या हिंदी पट्ट्यातली जनसंख्या अणि तिच्या वृद्धीचा दर या बाबी चिंताजनकच आहेत; परंतु या सगळ्यांकडे उत्तर प्रदेशमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या झरोक्यातून पाहिले जात आहे. एक प्रकारे याकडे योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशमधल्या मुस्लिमांच्या विरोधात हिंदू ध्रुवीकरणासाठी केलेला प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे. योगी आदित्यनाथ यांच्याकडे एक हिंदू नेता या प्रतिमेतून पाहिले जाते, ही वस्तुस्थिती आहे; परंतु २०१९मध्ये आसाममध्ये जनसंख्या नियंत्रण कायदा संमत करण्यात आला तेव्हा हा कायदा मुस्लीमविरोधी आहे, अशी टीका झाली होती. त्यामुळे या दोन्हीकडे हिंदू अथवा मुसलमान असे न बघता लोकसंख्येच्या परिप्रेक्षातून पाहायला हवे. अर्थातच निवडणुकीच्या तोंडावर या कायद्याला माननीय सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाईल, हे आता स्पष्ट दिसत आहे. या विषयाची चर्चा राष्ट्रीय पतळीवरील महत्त्वाचा विषय म्हणून आणि उद्या देशभर हा कायदा लागू होऊ शकतो म्हणूनही आवश्यक आहे. बरोबर याच वेळी कर्नाटकमधले भाजप मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनी जनसंख्या नियंत्रित करण्यासाठी दोन मुलांचा कायदा हवा असे सूतोवाच केले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वेची आकडेवारी दिसत आहे. २०१६ची ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या बिहारमधल्या ३८ टक्के मुस्लीम महिलांनी दोनपेक्षा अधिक मुले नकोत, असे म्हटले आहे. उत्तर प्रदेशमध्ये हाच आकडा ५३ टक्के तर जम्मू-काश्मीरमध्ये ५८ टक्के आणि पश्चिम बंगालमध्ये ८५ टक्के इतका मोठा आहे. बदलत्या काळातली मुस्लीम महिलांची मानसिकता यातून समोर येते; तसेच फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनने गेल्या चार दशकांमध्ये केलेल्या उत्तम कामाचं फलितही समोर येत आहे. यापेक्षा अधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जसजसा एखादा समाज मुख्य प्रवाहात येतो आणि सामाजिक, आर्थिक स्तर उंचावला जातो, तेव्हा अशी आकडेवारी समोर येत असते. लक्षात घ्या, २०२७ मध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भारत चीनला मागे टाकेल. ही गोष्ट धडकी भरवणारी आहे. महाराष्ट्राची जनसंख्या आणि तिच्या वृद्धीचा दर स्थिर ठेवण्यासाठी प्रजनन दर २.१ इतका असणे आवश्यक आहे. म्हणूनच या कायद्याकडे हिंदू विरुद्ध मुस्लीम असे पाहता येणार नाही. दोन मुले या धोरणावर आणखी एक टीका होते. ती म्हणजे उद्या युद्ध झाले, तर लढायला माणसे कुठून येणार, शेतात आणि कारखान्यांत काम करायला मजूर कुठून येणार, हे या संदर्भातले आक्षेप अज्ञानातून आले आहेत. याचे कारण आता शेती आणि कारखान्यांमधल्या कामाचे स्वरूप आणि युद्धतंत्र पूर्णपणे बदलले आहे. एकीकडे असा जनसंख्या नियंत्रण कायदा संपूर्ण देशात का नको, असा आग्रही, आक्रमक समर्थनपर सूर जसा दिसत आहे; तसाच कोरोना नियंत्रणाचे अपयश लपवण्यासाठी केलेला प्रयत्न, अशी टीकादेखील होत आहे. नेमक्या निवडणूक वर्षातच हे का बरे सुचले, असा सवाल देखील केला जात आहे; परंतु भारताची वाढती लोकसंख्या आणि शिक्षण, आरोग्य, रोजगार, कायदा-सुव्यवस्था, पायाभूत सोयी-सुविधा यांच्या आव्हानांशी असलेला संबंध याबद्दल नॅशनल फॅमिली हेल्थ सर्वेमध्ये झळकणाऱ्या आकडेवारीकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. असाच प्रयत्न चीननेदेखील केला आणि एक दाम्पत्य एक मूल' ही सक्ती केली. त्याचे दुष्परिणाम त्यांनी भोगले आणि आता पुन्हा दोन मुलं' हे राष्ट्रीय धोरण त्यांनी जाहीर केले आहे. भारतामध्ये जनसंख्या नियंत्रणाची योजना राबवताना जागतिक स्तरावर विविध राष्ट्रांना आलेल्या अनुभवांमधून शिकणे महत्त्वाचे आहे. लोकसंख्या नियंत्रण लोकशाहीविरोधी नाहीच नाही आणि कोणत्याही एका समुदायाविरोधातही नाही. हे मत समस्त भारतीयांना पटणे गरजेचे आहे.

# महाराष्ट्राचे सक्षम कुटुंबप्रमुख

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस नुकताच पार पडला. बाळासाहेब ठाकरेंनंतर उपहासाच्या, उपरोधाच्या, दुर्लक्षाच्या, कोंडी करणाऱ्या सर्व लाटांना समर्थपणे तोंड देत त्यांनी संघटनेवर पकड बसवली. कोरोनासारख्या अनेक संकटांचा सामना करत ते महाविकास आघाडीचं सरकार चालवतायत. याकाळात संकटमोचक, कुटुंबप्रमुख म्हणून त्यांचा प्रवास नेमका कसाय ते सांगतायत शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत.**

निमित्त

अरविंद सावंत

मन शुद्ध तुझं गोष्ट आहे पृथ्वीमोलाची
तू चाल पुढं तुला रं गड्या भीती कशाची

या कवितेच्या ओळी शोभतील असं आजच्या राजकारणातलं व्यक्तिमत्व म्हणजे उद्धव ठाकरे. त्यांनी आपल्या वर्तनातून हे सिद्ध करुन दाखवलं. मी या कवितेच्या ओळी उद्धृत केल्यानंतर प्रत्येक वाचकाला हे खरं आहे का, असं वाटणं साहजिक आहे; पण स्वच्छ दृष्टीनं पाहिलं तर लक्षात येईल की, ते खरं आहे. १२ नोव्हेंबर २०१२. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुखांचं देहावसानं झालं आणि त्यानंतर शिवसेनेचं काय होईल, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. अनेकांना आनंदाच्या उकळ्याही फुटल्या असतील. एक मृदू स्वभावाचं व्यक्तिमत्त्वं शिवसेनेच्या शीर्षपदी आल्यामुळं त्याला राजकारणात सहजगत्या गुंडाळता येईल अशी अनेकांनी भाकितंही केली. काहींनी मनातल्या मनात तशी अढी धरली. इतकंच नाही तर आता शिवसेना संपणारच अशा आविर्भावात तोंडाच्या वाफा दवडणं सुरू झालं. पण यानंतर १५ दिवसांनी उद्धवजी एक वाक्य बोलले, आता रडायचं नाही, लढायचं.' लढायचं म्हणून ते घरी बसून राहिले नाहीत; तर त्यांनी उभा महाराष्ट्र पालथा घालायला सुरवात केली.



### बाळासाहेबांनंतर संघटनेवर पकड

मुळात, माँ साहेबांच्या स्वभावामुळे उद्धवजींमधे करुणेचा भाग मूलतःच आहे. मृदूता, कारुण्य हे त्यांच्या रक्तात भिनलेलं आहे; पण याच जोडीला आदरणीय शिवसेनाप्रमुखांचा कणखरपणाही त्यांच्यात आहे. शिवसेनाप्रमुखांच्या उतरत्या काळात, त्यांच्या आजारपणाच्या काळात राज ठाकरे शिवसेना सोडून गेले; पण तेव्हाही उद्धवजींनी संघटनेकडे ज्या पद्धतीने पाहिलं, लक्ष दिलं आणि ज्या धीरोदात्तपणे उभे राहिले त्याची नोंद इतिहासाला घ्यावी लागेल. किल्ल्यांचे बुरुज ढासळावेत, तटबंदी उभी आहे की काय असं वाटावं आणि तीसुद्धा एखाद्या वाऱ्याच्या झुळुकेनं उडून जाईल असंही काहींना वाटलं असावं; पण ती कणखरपणानं उभी राहिली, लाटांना तोंड देत. त्या लाटा होत्या उपहासाच्या, उपरोधाच्या, दुर्लक्षाच्या, कोंडी करणाऱ्या. या सर्व लाटांना समर्थपणे तोंड देत हा हा म्हणता उद्धवजींनी संघटनेवर पकड बसवली.

### शेतकऱ्यांसाठी स्वतःच्या सरकारविरोधात

२०१४ च्या लोकसभा निवडणुकांमधे शिवसेना भाजपाची युती झाली. दिल्लीत कारभार सुरू झाला; पण महाराष्ट्रात शिवसेनाप्रमुख नाहीत याचा फायदा घेऊ, असा विचार भाजपानं केला आणि एकनाथ खडसेंना पुढं करुन युती तोडली. कालांतराने पुन्हा आम्ही एकत्र आलो; पण दोन्हीही सरकारांमधे शिवसेनेला ज्या पद्धतीने वागवलं जात होतं, त्याचा बारकाईनं अभ्यास उद्धवजी करत होते. त्यांचा स्वभाव शिवसेनाप्रमुखांसारखा नाही. त्यामुळं ते फारसे प्रतिक्रिया देत नव्हते; पण प्रतिक्रियेची तयारी मात्र मजबूत करत होते. केंद्रीय मंत्रीमंडळात शिवसेनेला नगण्य समजलं जात होतं. राज्यातही कारभार कुणी तरी हाकतंय आणि शिवसेना त्यामागून फरफटत चाललीय असा प्रकार सुरू होता. याची खूप मोठी किंमत पक्षाला द्यावी लागत होती. शेतकऱ्यांचा प्रश्न बिकट बनला तेव्हा एनडीएचे घटक असलेले उद्धवजी आग्रह धरत राहिले की शेतकऱ्यांना कर्जमुक्ती द्या. पण शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्यानं टाळाटाळ करत राहिले. शेवटी उद्धवजींनी आम्ही रस्त्यावर उतरू' असं सांगितलं आणि प्रत्यक्षात उतरलेही. स्वतःच्याच सरकारच्या विरोधात. तेव्हा सरकारला झुकावं लागलं. त्यावेळी कर्जमुक्ती न करता कर्जमाफी केली. त्यामधेही प्रचंड अटीशर्ती घातल्यानं गोरगरीब, अशिक्षित शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळालाच नाही. वास्तविक, उद्धवजी नेहमी म्हणायचे की, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी नको, कर्जमुक्ती हवी. कारण माफी ही गुन्हा करणाऱ्याला केली जाते; माझा शेतकरी गुन्हेगार नाही. त्यामुळं त्याला कर्जाच्या विळख्यातून मुक्त केलंच पाहिजे, हा विचार त्यांनी दिला.

### सर्वसमावेशक भूमिका

उद्धवजी नेहमीच सर्वसमावेशक भूमिका घेतात. याचं उत्तम उदाहरण म्हणजे मी मुंबईकर'. काय होती ही संकल्पना? उद्धवजींचं म्हणणं होतं की, जी माणसं भलेही जन्मानं मुंबईकर नसतील; पण पिढ्यानपिढ्या इथं वास्तव्याला आहेत, त्यांचा मुंबईच्या जडणघडणीला, उभारणीला हातभार लागलेला आहे- मग तो कोणत्याही जातीधर्माचा का असेना- त्याला ही मुंबई आपली वाटली पाहिजे. मुंबई वाचली पाहिजे, असं त्यालाही मनोमन वाटलं पाहिजे, हा त्यामागचा विचार होता. हा लढा कुठल्याही परप्रांतियांविरोधात नव्हता. मुंबईवर तिच्या क्षमतेपेक्षा अधिक बोजा टाकला जात असताना त्यासंदर्भात जेव्हा शिवसेना उभी राहते तेव्हा या सर्वानी मुंबईकर' म्हणून उभं राहिलं पाहिजे आणि मुंबई वाचवली पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. पण जाणीवपूर्वक त्याला मराठी-अमराठी असा रंग दिला गेला. आज लक्षात येतंय की उद्धवजींची ती भूमिका सर्व पक्षांनी स्वीकारली असती तर मुंबईचं चित्र आज निश्चितपणानं वेगळं असतं. उद्धवजींनी दुसरा विचार मांडला, तो म्हणजे शिवशक्ती आणि भीमशक्तीच्या एकजुटीचा. रामदास आठवलेंना उद्धवजींनी शिवसेनेसोबत आणलं. शिवशक्ती आणि भीमशक्ती एकत्र आली तर राष्ट्रभक्ती, राष्ट्रशक्ती तयार होईल, असं त्यांचं म्हणणं होतं. दुर्दैवानं, ते फारसं यशस्वी झालं नाही.

### उद्धवजींनी करून दाखवलं

२०१९ च्या निवडणुकांपूर्वी शिवसेनेचं एक महाशिबीर गोरेगावला झालं. तेव्हा त्यांनी आवाज दिला, होय, युतीमधे आमची २५ वर्ष सडली आणि आता आम्ही यांच्यासोबत जाणार नाही. आम्ही एकाकी लढणार.' त्यावेळी भाजपाला असं वाटलं की उद्धवजी एकटे काय करणार ! कारण रामदासजी आठवले, महादेव जानकर यांनीही शिवसेनेची साथ सोडली होती. एकट्याच्या जीवावर उद्धवजींनी ६३ आमदार निवडून आणले. शिवसेनाप्रमुखांना त्यांनी वचन दिलं होतं की, मी शिवसेनेला दोन पावलं पुढं घेऊन जाईन. त्या वचनाची पूर्तता केली. मुंबई महानगरपालिका जिंकून दाखवली.

### भीतीमुळे अमित शहा मातोश्रीवर

२०१४ च्या विधानसभा निकालानंतर आम्ही विरोधी बाकावर बसलो होतो; पण भाजपानं आपण समविचारी असल्याचा सूर आळवत विनवण्या केल्यानं आम्ही पुन्हा एकत्र आलो. प्रमोद महाजन हयात असतानाही भारतीय जनता पक्षाचे नेते नेहमी म्हणायचे शतप्रतिशत भाजपा'. याचा अर्थ सेनेची ताकद कमी करण्याचा डाव पूर्वीपासूनच होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्या पूर्वी सबंध देशभरातल्या मीडिया, विश्लेषकांनी पुन्हा मोदींचं सरकार येणं कठीण असल्याचं किंवा आलं तरी काठावरच्या बहुमतानं येईल असं सांगायला सुरवात केली होती. त्या भीतीपोटी अमित शहा मातोश्रीवर आले. जो होगया सो हो गया म्हणत सेनेला गळ घातली.

### शिवसेना दूर जायचं कारण

उद्धवजींवर, शिवसेनेवर, शिवसैनिकांवर बाळासाहेबांचा एक खूप मोठा संस्कार आहे, तो म्हणजे शब्दांना, वचनांना जागणं. वचन देणारी आणि वचनाला जागणारी अशी शिवसेनेची प्रतिमा आहे. त्यामुळंच उद्धवजींनी अमित शहांनी पुढं केलेल्या मैत्रीच्या हाकेला कसलाही आडपडदा न ठेवता सकारात्मक प्रतिसाद दिला. खरं म्हणजे, हीच परिस्थिती उलटी असती तर भाजपावाल्यांनी चर्चेचं गुऱ्हाळ मांडलं असतं. अनेक विद्वान कागद-चिठ्ठ्या घेऊन आले असते. जागांवरुन चर्चा केली असती. पण उद्धवजींनी असलं काहीही केलं नाही. महाराष्ट्रामधे भाजपा हा शिवसेनेच्या वटवृक्षावर वाढलेला वेल आहे. तो शिवसेनाप्रमुखांचा दिलदारपणा होता. लाखोंच्या गर्दीचं व्यासपीठं साहेबांनी मुंडे-महाजनांना उपलब्ध करुन दिलं. पण भाजपवाल्यांच्या मनात कपटीपणा होता. यांच्या तंबूत शिरुन तो तंबूच बळकवायचा ही धारणा घट्ट रुजलेली होती. त्यानुसार भाजप शिवसेनेच्या तंबूत शिरली आणि हा तंबूच उखडण्याचा प्रयत्न केला. शिवसेना दूर गेली. पण या घटनेमुळं अमित शहांच्या येण्यानं एकत्र निवडणुका लढवण्याचं ठरलं. त्यानुसार लोकसभेच्या निवडणुका एकत्र लढलो आणि विधानसभा निवडणुकांसंदर्भात सत्तापदांचं ५०-५० टक्के वाटप होईल, असं आश्वासन दिलं होतं, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

### म्हणून महाआघाडीचं सरकार आलं

आजही त्या वीडियो क्लिप उपलब्ध आहेत. उद्धवजींनी दिलदारपणा दाखवला; पण यांनी काय केलं? एकत्र लढलो तेव्हा पोलचा कयास होता की सेनेच्या ८५-९० जागा येतील. पण बरोबर राहून भाजपाने पाठीत खंजिर खुपसल्याने आमचा आकडा ५६ वर गेला. यामागं भाजपाचं कारस्थान होतं. याचं एकच उदाहरण सांगतो. ते म्हणजे दीपक केसरकर!

सावंतवाडीतून केसरकरांना उभं केल्यानंतर भाजपानं स्वाभिमानशून्य राणेंना सोबत घेतलं. केसरकरांविरोधात राजन तेलींना उभं करण्यात आलं. केसरकरांनी देवेंद्र फडणवीसांशी संपर्क साधूनही भाजपाच्या कार्यकर्त्यांनी शेवटपर्यंत त्यांचा प्रचार केला नाही. उलट गोव्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नी सावंतवाडीत येऊन केसरकरांना पाडण्यासाठी ठाण मांडून बसले होते. असा हा भाजपा. निकालांनंतर उद्धवजींनी अमित शहांना दिलेल्या शब्दाची आठवण करुन दिली होती. पण तरीही ते महाराष्ट्रातील हा वाद सोडवण्यापेक्षा हरियाणाला गेले. यातच सारं काही आलं. भाजपानं दिलेलं वचन पाळलं नाही आणि महाविकास आघाडीचं सरकार आलं.

### खरं हिंदुत्त्व दाखवलं

ज्यांनी महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका काहीही पाहिलं नाही असे उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. शरद पवारांचं मार्गदर्शन मिळालं. काँग्रेस पक्ष सोबत आला आणि महाविकास आघाडी उभी राहिली. सरकार स्थापनेनंतरच्या पहिल्या भाषणात उद्धवजींनी विधानसभा जिंकली आणि दाखवून दिलं हिंदुत्त्व कशाला म्हणतात.

मुख्यमंत्री होताच उद्धवजी अयोध्येला गेले आणि आम्ही विचारधारा सोडलेली नाही, हे त्यांनी दाखवून दिलं. पाठीत खंजीर खुपसल्यामुळं कॉमन मिनिमम प्रोग्रॅम घेऊन आम्ही काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत एकत्र येऊन सरकार स्थापन केलं आहे, हे ठणकावून सांगितलं. त्यावेळी उद्धवजींना आपण कमी लेखल्याचं भाजपाला कळून चुकलं.

### कोरोनाच्या काळात महाराष्ट्राला सावरलं

आज उद्धवजी अतिशय सुंदरपणानं राज्यकारभार करत आहेत. सत्तेत आल्यानंतर लगेचच शेतकऱ्यांना कर्जमुक्त केलं. विशेष म्हणजे पेट्रोल पंपांवर फोटो लावून, लसीच्या प्रमाणपत्रावर फोटो छापून जसा गवगवा केला जातोय, असा कुठलाही प्रकार उद्धवजींनी केला नाही. समाजाप्रती असणारं कर्तव्य, वचनपूर्ती म्हणून मी हे काम केलं, असं ते सांगतात. सरकार स्थापनेनंतर काही महिन्यांतच कोरोनाचं संकट आलं. जगाला या संकटानं व्यापलं. भलीभले देश गोंधळात होते. आपलं केंद्र सरकार संभ्रमात होतं. केंद्र काय किंवा राज्यं, सगळ्यांना नवीन होतं. महाराष्ट्रात संसर्गाचा आकडा मोठा होता; पण त्याचं कारण म्हणजे महाराष्ट्रानं काही लपवलं नाही. खोटे अहवाल सादर केले नाहीत. उलट या ऐतिहासिक संकटाविरोधात उद्धवजी निर्धारानं उभे राहिले. ते देशातले एकमेव मुख्यमंत्री ठरले ज्यांनी फिल्ड हॉस्पिटल उभी केली. महाराष्ट्रात टेस्टिंग लॅबोरेटरी जेमतेम चार-पाच होत्या, त्यांनी ही संख्या ७०० वर नेली. महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्रातल्या नावाजलेल्या डॉक्टरांचा टास्क फोर्स उभा केला. कोरोनाच्या संकटावर अत्यंत सूक्ष्मपणानं त्यांनी लक्ष ठेवलं आणि महाराष्ट्राला यातून सावरलं. निर्बंधांबाबत कुणी कितीही टिका केली तरी माणसं जगवणं हे माझं प्रथम कर्तव्य आहे, असं सांगत निर्भयपणानं ते पार पाडलं.

संकटाची साखळी संपली नाही. चक्रीवादळं आली, अतिवृष्टी झाली, दरड कोसळली; पण अत्यंत धीरोदात्तपणे उद्धवजी जनतेच्या पाठिशी उभे राहिले. यापूर्वी संकटांमधे काय मदत करायची याची नियमावली ठरवली जायची. पण उद्धवजींनी नियमांपलीकडे जाऊन मदत देण्याचं धोरण स्वीकारलं आणि ते पारदर्शीपणानं अमलात आणलं. कोरोनाच्या काळात उद्धवजी सातत्यानं जनतेशी संवाद साधायचे. त्या संवादातून पाहता-पाहता लोक त्यांच्या अक्षरशः प्रेमात पडले. हे तर आपले कुटुंबप्रमुख वाटतात, अशी लोकांची भावना झाली. आपले आईवडील जशी मुलांची काळजी घेतात तसे हे मुख्यमंत्री पालकांच्या नात्यानं जनतेची मायेनं, ममत्वानं काळजी घेतात, हे लोकांना भावलं. आणि हा हा म्हणता, उद्धवजी लाखो-कोट्यावधी जनतेचे कुटुंबप्रमुख झाले. पंतप्रधान आणि इतर देशांनीही महाराष्ट्राचं कौतुक केलं. किंबहुना, मुंबईतल्या उपाययोजनांच्या कार्यपद्धतीचं अनुकरण करावं असं सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं. याहून उद्धवजींच्या कामाची आणखी कोणती पावती हवी? असे हे संकमोचक उद्धवजी. महाभारताच्या काळात पांडवांना कृष्ण लाभावा तसे आजच्या एकामागून एक येणाऱ्या संकटकाळात असे मुख्यमंत्री राज्याला लाभणं हे सद्भाग्य आहे. या सर्व संकटांवर मात करुन ते पुढे जातील यात तिळमात्र शंका नाही.

(लेखक शिवसेनेचे खासदार आहेत.)

# रांगड्या कर्तृत्वाचा सन्मान

व्यक्तीविशेष

सुकृत खांडेकर

त्यांचा स्वभाव आक्रमक व मनोवृत्ती लढाऊ असल्याने त्यांना राजकारणात अनेक विरोधक निर्माण झाले. पण आपली भूमिका मांडताना त्यांनी कशाची व कोणाची कधीच पर्वा केली नाही. अन्यायाविरोधात आवाज उठवणे हे तर त्यांच्या रोमारोमात भिनले आहे. एखाद्या विषयाला न्याय मिळवून देण्यासाठी ते सर्वस्व पणाला लावतात. टार्गेट निश्चित केल्यावर ते जिद्दीने लढा देतात आणि साध्य करून दाखवतात. नारायण राणे यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाल्यावर सर्वसामान्य जनतेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्यांचा शपथविधी टीव्हीच्या पडद्यावरून कोट्यवधी जनतेने बघितला तेव्हा लोकांना आनंदाचे भरते आले. आपला मराठमोळा कर्तृत्वान नेता केंद्रात मंत्री झाला व मोदीं-शहांनी त्यांचा सन्मान केला, याबद्दल लोकांना विशेष आनंद झाला. कोकणात फटाक्यांच्या माळा लावून जल्लोश साजरा झाला. माझा माणूस केंद्रात मंत्री झाला', अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली आहे.



नारायण राणे हे प्रथमच केंद्रात मंत्री झालेत. त्यांना पक्षाने आणि मोदी-शहांनी केंद्रीय मंत्रीपद देऊन मोठी शक्ती दिली आहे. त्यांच्या मंत्रीपदाचा लाभ पक्षाला मुंबई- कोकणात निश्चितच होईल, याची भाजपला खात्री आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या स्थानिक स्वराज संस्थांमधील निवडणुकीत सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपने वर्चस्व सिद्ध केले आणि रत्नागिरी जिल्ह्यात भाजपची ताकद लक्षणीय वाढली. यामागे राणे, त्यांचे कुटुंबीय व त्यांच्या कार्यकर्त्यांची फौज यांनी घेतलेले परिश्रम आहेत. पुढील वर्षी मुंबई महापालिकेची निवडणूक होत आहे. पस्तीस हजार कोटींचे बजेट असलेली महापालिका गेली पंचवीस-तीस वर्षे शिवसेनेच्या ताब्यात आहे. राज्यात सत्तेवर शिवसेना आणि राज्याचा मुख्यमंत्री शिवसेनेचा असून नगरविकास खातेही शिवसेनेकडे आहे. मुंबईबरोबरच ठाणे, कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई, वसई-विरार, पुणे, नाशिक, नागपूर आदी प्रमुख महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. अशावेळी शिवसेनेशी टक्कर देऊ शकणारा नेताच सेनेला रोखू शकतो व भाजपचे संख्याबळ वाढवू शकतो. नारायण राणे यांचे वलय, त्यांची लोकप्रियता, संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांची फौज आणि पक्षातील सर्व फळीतील नेते व पदाधिकारी यांच्याशी असलेले संबंध या सर्वांचा उपयोग भाजपला येत्या निवडणुकीत होऊ शकतो.

महाआघाडी आतून पोखरली आहे व संधी मिळताच तीनही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करीत असतात. ऑपरेशन कमळ करण्याचे ठरले तर त्यासाठी नारायण राणे हे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, याचीही श्रेष्ठींना जाणीव आहे. म्हणूनच त्यांना मोदी-शहांनी केंद्रात महत्त्वाचे स्थान दिले आहे. भाजपमध्ये शिस्त आहे. समाजातील सर्व स्तरातील व जाती-धर्मांचे लोक या पक्षात आहेत. पक्षाची ध्येय-धोरणे पक्ष कार्यकर्ते निष्ठेने राबवत आहेत. मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पक्षावर अंकुश आहे. त्यांचे वेळोवेळी पक्षाला मार्गदर्शन लाभते आहे. मंत्री आणि मुख्यमंत्री असताना त्यांनी आपल्या कामांचा ठसा उमटवला होता. तसेच विरोधी पक्षनेते असताना आक्रमक पण आदर्श विरोधी नेता कसा असावा, हे त्यांनी महाराष्ट्राला दाखवून दिले होते. शिवसेनेत असताना त्यांनी काँग्रेसला कापरे भरवले होते. आता भाजपमध्ये आल्यावर त्यांनी केलेल्या हल्लाबोलमधून शिवसेनेच्या मंत्र्यांना घाम फुटत आहे. राणेंनी प्रहार केल्यावर त्याचा पलटवार करण्याची हिम्मत शिवसेनेत कोणामध्येही नाही. डॉ.चिंतामणराव देशमुख, बॅ.नाथ पै, प्रा.मधु दंडवते, अशी कोकणच्या नेत्यांची परंपरा आहे. हीच मालिका नारायण राणे केंद्रीय मंत्री म्हणून आणखी उंचावतील, अशी कोकणवासीयांना आशा वाटते. महत्त्वाकांक्षी आणि कर्तव्यदक्ष असलेल्या नारायणे राणेंकडून भाजपला राज्यात मोठे बळ मिळेलच, पण कोकणच्या विकासाला गती मिळेल, अशी आशा कोकणातील जनतेला आहे. (समाप्त)

(लेखक मुंबईस्थित ज्येष्ठ संपादक आहेत.)

# ऊर्ध्व कुंडलिका ओव्हरफ्लो ; बळीराजाच्या चेहऱ्यावर हास्य

प्रतिनिधी

वडवणी : उर्ध्व कुंडलिका धरण भरले आणि वडवणी, धारूर तालुक्यातील बळीराजाच्या चेहऱ्यावरील हास्य फुलले आहे. पिण्याच्या पाण्याची सोय तर झालीच शिवाय शेतीसाठी पाणीही मिळणार असल्यामुळे ते सुखावले. यावर्षी पहिल्याच्या टप्प्यात हा प्रकल्प तुडुंब भरून ओसंडून जातोय. तालुक्यासाठी हा प्रकल्प वरदान ठरला आहे. वडवणी तालुका हा कायम दुष्काळाच्या खाईत असायचा मात्र अप्पर ऊर्ध्व कुंडलिका धरणामुळे या तालुक्याचे नंदनवन झाले आहे. दरम्यान, लवकरच धरणाचे दरवाजे उघडण्यात येत असल्यामुळे नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या प्रकल्पातील प्रकल्पीय पूर्णसाठा क्षमता १८.७७ द.श.घ.मी.असून, जलाशयाची पूर्ण पाणी पातळी ५३७ मीटर आहे. या प्रकल्पातील जिवंत पाणी साठा १५.५७ द.श.घ.मी.असून, ३० जुलै रोजी या धरणात ५३६.३५ पाणीसाठा आहे. तालुक्यातील जवळपास २ हजार ८०० हेक्टर शेती या धरणाच्या पाण्यामुळे ओलिताखाली आल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला दिलासा मिळाला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच हा तलाव पूर्णक्षमतेने भरत असल्यामुळे शेतकऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. हवामान खात्याच्या इशारानुसार धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी होण्याची शक्यता असून, या धरणात पाण्याची झपाट्याने वाढ होत असल्यामुळे येणारे पाणी हे कुंडलिका नदीपात्रात सोडावे लागत आहे. याबाबत बीड पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता अजय गुजर म्हणाले की, हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी होण्याची शक्यता असून, धरणात येणाऱ्या येव्यामुळे धरण निर्धारित पातळीत भरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यानंतर येणारा येवा कुंडलिका नदीपात्रात सोडावा लागणार आहे. धरणात येणाऱ्या येवा पाहता रविवारी ५३६.३५ मीटर या पातळीनंतर येणाऱ्या येव्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात येत आहे. याबाबत तहसीलदार प्रकाश सिरसेवाड म्हणाले की तलावाची पाहणी केली असून, जवळपास ९० टक्के भरलेले आहे. ९० टक्के धरणाची पातळी ५३६.४५ असून, कधीही पाऊस पडला की धरणातून पाणी सोडले जाईल. नदी काठावरील गावांना, नागरिकांना याबाबत कळविले आहे. वडवणी तालुक्यातील या वरदान ठरलेले ऊर्ध्व कुंडलिका धरणात गेल्या पंधरा दिवसांपासून सतत पडणाऱ्या पावसामुळे या धरणाच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊन धरणात रविवारी ९० टक्के पाणीसाठा असून, धरण पूर्णक्षमतेने भरत असल्यामुळे येणाऱ्या पाण्याचा निसर्ग मोठ्या प्रमाणात होत असल्याने या धरणाचे दरवाजे उघडण्यात येत असल्यामुळे नदीकाठच्या गावांना व शेतकऱ्यांना आणि नदीशेजारी वस्ती करून राहणाऱ्या लोकांना जिल्हा प्रशासनाने व तालुका प्रशासनाकडून सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

### शिवसेनेकडून जलपूजन

सोन्नाखोटा उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प तुडुंब भरला असल्याने प्रती वर्षीप्रमाणे वडवणी तालुका शिवसेनेच्या वतीने माजी तालुकाप्रमुख विनायक मुळे यांच्या शुभ हस्ते जलपूजन करण्यात आले. यावेळी युवराज शिंदे, अशोक चाटे, मुन्ना पवार, अशोक गोंडे, युवा नेते नरेंद्र राठोड, ओम जाधव, उध्दव काकडे, महेश जाधव, राजेश चव्हाण, जयदेव खोटे आदींची उपस्थिती होती.



# कोरोनाबाबत गाफिल राहू नका

## भाजपा युवा नेते गोरख पुर्णे यांचे आवाहन

प्रतिनिधी

धारूर : कोरोनाबाबत प्रत्येकाने दक्ष राहणे काळाची गरज आहे. कोरोनाबाबतीत गाफिल राहू नका, असे आवाहन भाजपा भटके-विमुक्त आघाडीचे धारूर तालुका संयोजक गोरख पुर्णे यांनी केले आहे.

जिल्ह्यात कोरोनाचा उद्रेक झाल्यामुळे दुसऱ्या लाटेत अनेक तरूण जबाबदार व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले. सर्व व्यवहार ठप्प झाले होते. त्याचे चटके सर्व सामान्यांना अजून देखिल आहेत. निष्काळजीमुळे दुसऱ्या लाटेत अचानक उद्रेक झाला. अनेक जणांचा तर भीतीपोटी जीव गेले. त्या कोरोना महामारीला आपण सुरवातीच्या काळात एवढे गांभीर्य पूर्वक पाहिले नाही. त्यामुळे आपल्या भारत देशावर महामारीचे संकट वाढत गेले होते. आता ही तिसऱ्या लाटेतील परिस्थिती पाहता आपल्या धारूर व इतर तालुक्यात ग्रामीण भागात वाढत चाललेली रूग्णसंख्या पाहता आपल्या मनातील भिती गेली. आपण निष्काळजीपणा करतोय असे दिसते आहे. मात्र या महामारीची भिती गेली असली तरी संकट हे कायम आहे. या महामारी पुढे आरोग्य विभागही हतबल होईल. अशी पुन्हा परिस्थिती पहायची नसेल. तर प्रत्येकाने आपली स्वतःची काळजी घेण्याची त्याचबरोबर आपल्या कुटुंबांची काळजी घेण्याची घराबाहेर विनाकारण जाणे टाळावे. अतिमहत्त्वाच्या कामानिमित्त गेलात तर सोशल डिस्टन्स ठेवणे, मास्क वापरणे, हात धुणे, नेहमी सॅनिटायझरचा वापर करणे, शक्यतो गर्दीमध्ये जाणे टाळावे, आपल्याला आरोग्य विषयक काही त्रास असल्यास घरात न बसता त्या आजाराबाबत डॉक्टरांचा सल्ला घेऊन कोरोनाची टेस्ट करणे. योग्य राहील यामुळे जास्त आजार वाढणार नाही, तो लवकर बरा होईल.



बीड जिल्ह्यात जवळपास सर्वच तालुक्यात ग्रामीण भागात कोरोनाचे रूग्ण वाढत आहेत. यामुळे संबंधित ग्रामपंचायत ग्रामसेवक गांभीर्य घेत नाहीत, असे अनेक गावातील रूग्ण संख्या पाहता लक्षात येते. नागरिकांना वेळोवेळी जनजागृती करून कळवणे. बंधनकारक असताना ग्रामपंचायतकडून लक्ष दिले जात नाही. यामुळे ग्रामीण भागातील रूग्ण संख्या वाढत आहे. याबाबत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद यांनी ग्रामपंचायत स्तरावर कडक शासन करावे, अशीही मागणी गोरख पुर्णे यांनी या प्रसिद्धीपत्राव्दारे केली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील होत असलेली गर्दी व धारूर शहरातील बाजारातील गर्दी यामुळे तालुक्यातील संसर्ग वाढू नये. यासाठी सर्व नागरिकांनी स्वतःहून शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करावे, असे आवाहन कोळी युवा महासंघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा भाजपा भटके-विमुक्त आघाडी धारूर तालुका संयोजक गोरख पुर्णे यांनी या प्रसिद्धीपत्राद्वारे केले आहे.

# शाहूनगरमधील अतिक्रमण हटवा

## नागरिकांची मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील शाहूनगर येथील तलाठी कार्यालयाच्या मागील भागात पंधरा फुटांचा रस्ता असून त्यावर अतिक्रमण करण्यात आलेले आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना रहदारीसाठी समस्या निर्माण होत असल्याने हे अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शहरातील अनेक भागात नाल्यांसह रस्त्यावर अतिक्रमणे करण्यात आलेली आहेत. परिणामी रस्ते अरूंद होवून रहदारीसाठी मोठी समस्या निर्माण होत आहे. तसेच तुंबलेल्या नाल्या काढण्यास अडचण निर्माण होत असल्याने सांडपाणी तुडुंब भरून अस्वच्छता पसरली जात आहे. असा प्रकार शहरातील शाहुनगर भागातील तलाठी कार्यालय परिसरात झालेला आहे. नाल्यांसह रस्त्यावर बांधकामे ज्यात मोठे, कंपाऊंड मारण्यात आले आहे. त्यामुळे रस्ता अरूंद झाला असून रिक्षा, दुचाकी वाहनासह पायी चालण्यासही त्रासदायक ठरत आहे. या समस्येने त्रस्त झालेल्या या भागातील मदनराव करांडे, अर्जुनराव आडे, लोभाजी चव्हाण, सुनिल सावळगे, राजाराम म्हेत्रे, रामभाऊ शिंदे, यु.जी.राठोड, कैलास जाधव नागरिकांनी हे अतिक्रमण तात्काळ हटवून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनाव्दारे मुख्याधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.


Change of working and practising address

**Dr.Sunanda Uttamrao Bhoskar**
**State Reg. No. I- 38033-A-1**
**Teacher code - AYKC02054**

I am currently working as a Professor, and practising at Rani Dullaiya Smriti PG Ayurved College & Hospital, Bhopal (M.P.), Barkhedi Kalan, Bhadbhada Road, Bhopal, M.P. 462044, since 3rd April, 2021.


# धारूर बाजार समितीच्या संचालकपदी सदाशिव बडे

प्रतिनिधी

धारूर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव बडे यांच्या निधनाने रिक्त झालेल्या संचालक पदावर त्यांचे सुपुत्र सदाशिव बडे यांची निवड करण्यात आली.

धारूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती महादेव बडे यांचे मे महिन्यात निधन झाले होते. सभापती पदावर असतानाच त्यांचे निधन झाल्याने तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात होती.

दिवंगत महादेव बडे यांच्या निधनाने रिक्त झालेल्या सभापतीपदी सुनिल शिनगारे यांची गेल्या नुकतीच निवड करण्यात आली. तर त्यांच्या संचालक पदावर त्यांचे सुपुत्र तथा कासारीचे उपसरपंच सदाशिव बडे यांची सोमवारी निवड करण्यात आली. सोमवारी कृषी उत्पन्न बाजार समितीची विशेष बैठक घेण्यात आली होती. याबैठकीत दिवंगत महादेव बडे यांच्या रिक्त जागेवर संचालक म्हणून सदाशिव बडे यांना घेण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. यानिवडीनंतर भाजपाचे जेष्ठ नेते राजाभाऊ मुंडे, धारूर कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सुनिल शिनगारे, माजी पं.स.सभापती अर्जुन तिडके, संचालक महादेव तोंडे, ड.नवनाथ पांचाळ, बालाजी चव्हाण, शिवाजी मायकर, तुकाराम तिडके, सचिव दत्ता सोळंके आदिंनी सदाशिव बडे यांचा सत्कार केला.



# रमेश सोळंके यांना मातृशोक

प्रतिनिधी



माजलगाव : येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांच्या मातोश्री श्रीमती सुमन आसाराम सोळंके (वय ७२ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने गुरूवार, दि.२९ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर येथे मंगलनाथ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !


# पीककर्ज वाटपाबाबत तहसीलदारांचे बँकांना निर्देश

## शेकाप नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील यांची भूमिका निर्णायक

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची चाललेली हेळसांड थांबवण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या पुढाकाराने प्रशासनाकडे तक्रारी आल्यानंतर तहसीलदार वैशाली पाटील यांनी सर्व बँकांची बैठक घेऊन पीक कर्ज वाटपाबाबत आढावा घेतला. त्यानंतर बँकांनी तत्काळ कर्ज वाटप करावे तर, शेतकऱ्यांनी बैंक अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन केले.

राष्ट्रीयीकृत दर्जाच्या बँकांना नोटीस काढून शुक्रवारी सकाळी पीक कर्जाबाबत आढावा घेण्यासाठी बँकांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची तहसील कार्यालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील बँक निहाय सर्व शाखांकडे आलेले अर्ज , मंजूर तसेच वाटप केलेले पीक कर्ज, येणाऱ्या अडचणींबाबत तहसीलदारांनी सविस्तर आढावा घेतला. बँक अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात तसेच शेतकऱ्यांनी देखील बँकांच्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, सुरळीत कर्ज वाटपास मदत करावी असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले. यावेळी तालुक्यातील विविध बँकांच्या शाखा अधिकाऱ्यांसह संभाजी ब्रिगेडचे नेते विजय दराडे, अॅड.पांडुरंग गोंडे, शेकापचे भाई लहू सोळंके, निलाराम टोळे, बाळासाहेब मिसाळ, बाळासाहेब टेकाळे, छत्रभूज ताकट, बाबूराव कोल्हे, माऊली चंदनशिव, राजूभाऊ जाधव, सिद्धेश्वर गायकवाड, मुंजा पांचाळ, समाधान पौळ यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.




# आधुनिक शेतीला प्राधान्य ; दोनशे हेक्टरवर फळबाग

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यात गेल्या तीन ते चार वर्षापूर्वी दुष्काळी परिस्थिती व बदलते उष्ण व थंड वातावरण यामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांसोबतच मोसंबी, संत्रा, डाळींब, केशर आंबा, पपई, पेरू, लिंबोनी, बोर, चिक्कू, जांभूळ, चिंच व सिताफळासह काही ठिकाणी प्रायोगिक तत्वावर सफरचंद लागवड करून कमी पाणी व कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादनाचा मार्ग स्वीकारत असल्याचे दिसते. मागील दोन वर्षात तालुक्यात विविध बागा लागवडीमध्ये तीन ते चार पटीने वाढ झालेली असून शेतकरी पारंपरिक पद्धतीला फाटा देत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत फळबाग लागवडीकडे वळत आहेत. दरम्यान, माजलगाव तालुक्यात दोनशे हेक्टरवर फळबाग लागवड झाल्याची माहिती कृषी खात्यातील सूत्रांनी दिली.

माजलगाव तालुक्यात मागील तीन-चार वर्षापूर्वी निसर्गाच्या लहरीपणामुळे दुष्काळी परिस्थिती होती. मागील वर्षीपासून परिस्थिती बदलली असून मागील वर्षी जोरदार पाऊस व अतिवृष्टीमुळे म्हणावे तसे उत्पादन शेतकऱ्यांना मिळालेले नाही. कोरड्या व ओल्या दुष्काळामुळे शेतकरी मेटाकुटीस येत असतानाच शेतकरी पारंपरिक पद्धतीच्या शेतीला फाटा देत शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान वापरून फळबाग लागवडीतून जास्तीचे उत्पादन आकर्षित करत आहे. माजलगाव तालुका उष्ण व थंड कटिबंधात येतो, ओले-कोरडे वातावरण येथे कायम राहते. याचे भान ठेऊन तालुक्यातील शेतकऱ्यांनी पावले उचचले असून फळबाग लागवड १५० ते २०० हेक्टर क्षेत्रात वाढ झालेली असल्याचे दिसून येते. कमी पाण्यावर व कमी खर्चात एकरी ऐंशी हजार ते एक लाख रूपयांचे निव्वळ उत्पादन या फळबागेतून मिळत असल्याने फळबाग उत्पादकांना काही प्रमाणात दुष्काळावर मात करण्यासाठी उपयोगी पडत आहे. गेल्या काही वर्षात फळबाग लगवडीचे क्षेत्र हे नगण्य होते, मात्र शेतकऱ्यात झालेल्या जनजागृतीमुळे व कमी खर्चात निघत असलेल्या उत्पदनामुळे शेतकरी मोसंबी, संत्रा, केशर आंबा, पपई, पेरू, लिंबोनी, बोर, डाळींब, चिकू, जांभूळ, चिंच व सिताफळा बरोबरच काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सफरचंद लागवडीकडे आकर्षित झाले आहेत.





### 'सिताफळ लागवडीला पसंती'

माजलगाव तालुक्यात कृषी विभागाकडे २०२० अखेर उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार फळबाग लागवड १५०.३२ हेक्टर झालेली असून त्यामध्ये सिताफळ लागवड असलेले ३८.५२ हेक्टर क्षेत्र आहे. मोसंबी ६८.३६ हेक्टर असून इतर क्षेत्रात शेतकऱ्यांनी आंबा, पेरू, लिंबु, संत्रा आदी फळबाग लागवड केलेली असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संगेकर यांनी दिली.



# पूरग्रस्तांच्या मदतीला राष्ट्रवादी महिला कॉंग्रेस

प्रतिनिधी

माजलगाव : सांगली, कोल्हापूर, कराड, महाड, चिपळूण भागात पावसामुळे आलेल्या महापुरातील पूरग्रस्तांना राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या वतीने एक हात मदतीचा या संकल्पनेतून बुधवारी किराणा साहित्य पाठविण्यात आले.

चिपळूण, कराड, महाड येथे आलेल्या पूरामध्ये अनेकांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे त्यांना काही प्रमाणात का होईना मदत व्हावी. या उद्देशाने माजलगाव येथून महिला कॉंग्रेसतर्फे मदत पाठविण्यात आली. यावेळी डी.बी. बागल, के.के.वारे, के.के.लढणारे, अॅड.प्रज्ञा खोसरे, संगीता तुपसागर, संध्या भांडेकर, अनिता वाघमारे यांची उपस्थिती होती.

# साहित्यरत्न भारतरत्न व्हावेत

## अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी मंत्री धनंजय मुंडेंचे प्रतिपादन

प्रतिनिधी

बीड : अण्णांच्या नावा आधी भारतरत्न लागावे यासाठी यश मिळेपर्यंत प्रयत्नशिल राहू असे म्हणत राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन केले.

वंचित सुशिक्षितांची वाणीने आपल्या अजरामर साहित्यातून शब्दबद्ध करून सर्वासाठी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आपले जीवन समर्पित केलेले साहित्यरत्नाला नमन करतो असे म्हणत धनंजय मुंडेंनी अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावे याचा पुर्नउच्चार केला. डफ ावर थाप मारत



मरगळलेल्या, झोपलेल्या समाजाला जागे करणारे, शब्दाचे रत्न आणि शब्दाचे शस्त्र आपल्या साहित्यातून बनविणारे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती आज राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.

कष्टकऱ्यांसाठी आणि शोषितांसाठी आपला देह चंदनासारखा झिजवणारे अण्णाभाऊंना भारतरत्न द्यावा अशी मागणी गेल्या कित्येक वर्षापासून होत आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करत अण्णाभाऊंना अभिवादन केले. यावेळी मुंडे यांनी साहित्यरत्न सोबतच अण्णांच्या नावाआधी भारतरत्न लागावे यासाठी यश मिळेपर्यंत प्रयत्नशिल राहू असेही म्हटले.



# सोन्नाथडीत अशोक डक यांच्या हस्ते विविध विकास कामांना प्रारंभ

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील सोन्नाथडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रविवार, दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सर्व प्रथम आण्णाभाऊच्या प्रतिमेला पुष्पहार घालून ध्वजरोहन करून अभिवादन करण्यात आले. दरम्यान, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांच्या हस्ते विविध योजनेअंतर्गत विकास कामांचा प्रारंभ झाला.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या सहकार्यातून रमाई घरकूल योजनेतून २५ घरकुलाच्या कामांचा प्रारंभ, गावातील सिमेंट रस्त्याच्या कामांचा प्रारंभ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक कंपाऊंड भिंतीच्या कामांचा प्रारंभ, तसेच ग्रामपंचायत मार्फत दिव्यागांसाठी पाच टक्के निधीचे लाभार्थ्यांना धनादेशाचे वितरण मुंबई बाजार समितीचे सभापती तथा सोन्नाथडीचे भूमिपुत्र अशोक डक यांच्या शुभहस्ते झाले. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पं.स. माजी सभापती जयदत्त नरवडे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजलगाव बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ, राजू भाई, ग्रामसेवक बुद्धवंत, यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.



# दिंद्रुड येथे शांतता समितीची बैठक

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील दिंद्रुड येथे शनिवारी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत गदारोळ झाला. याचे पर्यावसन दोन गटातील हाणामारीत झाले. यावरून गावात तणाव वाढू नये यासाठी रविवारी पोलीस स्टेशन ला शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश पाटील यांनी ग्रामस्थांना शांतता राखण्याचे आवाहन केले.

दिंद्रुड ग्रामपंचायत येथे शनिवारी दुपारी मासिक सभेचे आयोजन सरपंच अजय कोमटवार व ग्रामविकास अधिकारी अरुण पोटभरे यांनी केले होते. या बैठकीत ग्रामपंचायत सदस्यांच्या नाराजी वरून बाचाबाची झाली. वाद वाढल्याने त्याचे पर्यावसन हाणामारीत झाले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. दरम्यान, दिंद्रुड पोलिसात अनेकांवर दखलपात्र गुन्हे दाखल झाले आहेत. सदरील घटनेमुळे गावात तणावपूर्ण शांतता असून नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश पाटील यांनी शांतता समितीच्या बैठकीत केले. यावेळी सपोनि प्रभा पुंडगे व फौजदार विठ्ठल शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कोणत्याही परिस्थितीत गावात अशांतता पसरवणाऱ्यांची गय करण्यात येणार नसून येत्या काळात गावात शांतता अबाधित ठेवण्याचे आवाहन सपोनि श्रीमती पुंडगे यांनी केले. कायदा व सुव्यवस्था चोख ठेवण्यात पोलीस सक्षम असून नागरिकांनी कुठल्याही अफवा पसरवू नयेत असे आवाहन फौजदार विठ्ठल शिंदे यांनी सांगितले. या बैठकीस दिंद्रुड ग्रामस्थ, व्यापारी, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कॉ.कांगो यांना क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी

बीड : प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रमाणिकपणे प्राण पणाला लावून लढणाऱ्या नेत्याला क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापीठ विटा जिल्हा सांगलीच्या वतीने क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार दिला जात असतो. यंदाचा क्रांतिसिंह नाना पाटील सामाजिक पुरस्कार कॉम्रेड भालचंद्र कांगो यांना देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.



क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापिठ विटा जि.सांगली सन २००० पासून क्रांतिसिंहाच्या नावाने सामाजिक पुरस्कार देत आहे. क्रांतिसिंहांच्या वैचारीक वाटेवरुन राजकिय, सामाजिक जिवनामधे योगदान देत असलेल्या कार्यकर्त्यांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते. कॉम्रेड भालचंद्र कांगो यांची साम्यवादावरची अव्यभिचारी निष्ठा आणि श्रमिक कष्टकरी, शेतकरी, सर्वसामान्य माणूस यासाठी संघर्षरत असलेले त्यांचे योगदान विचारात घेऊन या वर्षी पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. सदरचा पुरस्कार येत्या दि.६ ऑगष्ट रोजी दुपारी १.३० वाजता विटा येथे क्रांतिसिंह नाना पाटील लोकविद्यापिठच्या सभागृहात होणार आहे. या समारंभाचे प्रमुख पाहुणे बेळगाव येथील साम्यवादी विचारवंत मा.प्राचार्य आनंद मेणसे असून क्रांतिविरांगणा हौसाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे. अशी माहिती क्रांतिसिंह परिवाराचे सदस्य शेकाप नेते भाई ॲड. नारायण गोले पाटील यांनी दिली आहे.

# कचारवाडीत तरूणाला मारहाण

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील कचारवाडी येथील तुकाराम किशन तंबूड (वय २३ वर्षे) या तरुणास कचारवाडी ता.धारूर येथे रविवार, दि.१८ जुलै रोजी सकाळी १० च्या दरम्यान अविनाश अंगद निरडे यांच्या शेतात गोठ्यावर अचानक अविनाश अंगद निरडे, अशोक अंगद निरडे, विष्णू भानुदास निरडे, सुरेश संदिपान निरडे, वैजनाथ बबन निरडे, सहदेव बबन निरडे, विजय संदिपान निरडे, आदी लोकांनी एकत्र येऊन लोखंडी रॉडने तुकाराम किशन तंबूड या तरूणास मारहाण केली, व तुला जिवे मारून टाकू असे धमकावले व या सर्वानी मोठ्या प्रमाणात मारहाण करत तूला जगू देणार नाहीत, असे धमकावले व मारहाण करुन पाय फ्रॅक्चर केला आहे. तरी दिंद्रुड पोलीस स्टेशन या सात जणाविरूद्ध भा.द.वि गुन्हा १८६० कलम ३२६, १४३,१४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरण तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रभा पुंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल शिंदे हे करत आहेत.



# सैनिक कल्याण निधीसाठी ५१ हजारांची मदत

प्रतिनिधी

माजलगाव : सैनिक कल्याण निधीसाठी ५१ हजार रूपयांचा धनादेश जिल्हाधिकारी रविंद्र जगताप यांच्याकडे माजी आमदार मोहनराव सोळंके यांनी सोमवार सुपूर्द केला.

माजी आमदार सोळंके हे मागील अनेक दिवसांपासून ऑगस्ट महिन्यात सैनिक निधीसाठी मदत करतात. यावर्षीही त्यांनी ५१ हजार रूपयांचा धनादेश जिल्हाधिकाऱ्यांकडे दिला आहे.

सोळंके शेतकरी व सामाजिक कार्यासोबतच देशसेवेसाठी लढणाऱ्या सैनिकांच्या मदतीसाठी नेहमीच पुढाकार घेतात. यावेळी नवनाथ थोटे, तेलगावचे सरपंच दीपक लगड, दत्ता डाके, ॲड.राज पाटील उपस्थित होते.

# बाबरी मुंडे मित्र मंडळातर्फे शालेय साहित्याचे वाटप

प्रतिनिधी

माजलगाव : सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त सम्राट अशोक नगर येथे १०१ विद्यार्थ्यांना बाबरी मुंडे मित्र मंडळाच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करून साजरी करण्यात आली.



अध्यक्षस्थानी राजेश घोडे हे तर उद्घाटक म्हणून विजय साळवे, प्रमुख मार्गदर्शक भास्कर शिंदे, सचिन आवचार, राकेश साळवे, अशोक ढगे यांची उपस्थिती होती. सकाळी दहा वाजता माजी सैनिक वैराळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर संध्याकाळी शालेय साहित्य वाटप, अभिवादन सभा घेण्यात आली. यावेळी गरजू विद्यार्थ्यांना एक डझन रजिस्टर, एक पेन व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन बाबरी मुंडे मित्र मंडळाचे विवेक जाधव यांनी केले होते. प्रास्ताविक आकाश ऊकंडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी मोरे, विराज आटवे, भैय्या क्षीरसागर, प्रतिक क्षीरसागर, आदित्य कांबळे, रोहित जाधव, केशव खंडागळे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन लहू ससाणे यांनी केले.



# चाटगावच्या सरपंचपदी रामभाऊ गडसिंग

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील चाटगाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी रामभाऊ नागुराव गडसिंग यांची निवड बिनविरोध निवड करण्यात आली. या निवड प्रक्रिया कार्यक्रमाला निर्वाचन अधिकारी म्हणून धारूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी चौरे, ग्रामसेवक दोडके आदी उपस्थित होते.

नवनिर्वाचित सरपंच रामभाऊ नागूराव गडसिंग, उपसरपंच बालासाहेब माणिकराव केकान यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष केशव विठ्ठल केकान, रमेश गडसिंग, राजेश साळवे, गोविंद गडसिंग, पवन घनघाव, सतिश देशमाने, सिद्धार्थ देशमाने, युवराज गडसिंग, लढा मानव मुक्तीचा चाटगावचे अध्यक्ष दीपक गडसिंग आदींची उपस्थिती होती.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नवविचार मांडणारे : उजगरे

प्रतिनिधी

माजलगाव : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून स्त्री ही ज्या व्यवस्थेत

वर्षानुवर्षे कुजत पडलेली असली तरी ही तिला मन आहे व ती ही एक माणूस आहे. त्याचप्रमाणे पारंपारिक संस्कृतीची चौकट मोडून अण्णाभाऊंनी साहित्यातून महिलेची पौराणिक रूढ प्रतिमा नाकारण्याचे काम केले व चालत आलेली रूढ प्रथा मोडीत काढली, असे मत लढा मानवमुक्तीचे अध्यक्ष सचिन उजगरे यांनी व्यक्त केले.

शुक्लतीर्थ लिमगाव येथे अण्णाभाऊ साठे यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त रविवार, दि.१ ऑगस्ट रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवाजी ससाने, भागवत वगरे, किसान वगरे, विवेक पौळ आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शेरकर यांनी केले







आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.